**महाराष्ट्र शासन**
**उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया**
११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया
ईमेलdmmugondia@gmail.com फोन नं ०७१८२ - २३६६२०

जा.क्र. म.रा.ग्रा.जी.अ./गो/३४२/२०१७ दिनांक -06/06/२०१७

## स्टेशनरी साहीत्य खरेदी बाबत

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहायाने दिनदयाळ अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी गोदिया जिल्हयात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, च्या संचालन करीता वेळोवेळी आवश्यकते नुसार स्टेशनरी साहीत्य पुरवठा करण्यास्तव दर निश्चित करुन एक वर्ष कालावधीसाठी Frame work agreement करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडुन मर्यादित ई-निविदा (Limited e-tender) प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छुक पुरवठादाराकडुन निविदा प्रक्रियामध्ये भाग घेण्यासाठी अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादाराकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate),
२. http://mahatenders.gov.inया संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा. (अर्जात login Id नमुद करावे किंवा संकेत स्थळाचा login Id असलेला स्क्रिन शॉट सादर करावे )
३. Shop and Estabeshment Act किंवा इतर सक्षम प्राधिकारी अंतर्गत वैध नोंदणी असावी.
४. PAN कार्ड असावे.
५. GST (Goods & Service Tax) अंतर्गत नोंदणी असावी.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक पुरवठादार यांनी वरील पैकी क्र. २ ते ५ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ, गणेश नगर गोंदिया या पत्यावर दिनांक १८ /०७/२०१७ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा. सदर अर्ज procurementgondia@gmail.com या ईमेल वर सुध्दा सादर करता येवू शकेल. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादार यांच्याकडून कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही. अर्ज सादर करण्याच्या मुदतीत किंवा इतर बाबी मध्ये काही बदल झाल्यास त्याबाबतची सुचना www.umed.in किंवा www.zpgondia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**जिल्हा अभियान संचालक(उमेद) तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गोंदिया**